**बातमी क्र.१**

जळगाव दि.12 (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागातील प्रोफेसर तथा विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन यांची जागतिक स्तरावरील चीनमध्ये अत्यंत प्रतिष्ठेच्या `ओव्हरसीझ फेमस टीचर` प्रकल्पासाठी दोन वर्षे तज्ज्ञ मार्गदर्शक (शिक्षक) म्हणून निवड करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार्य व शैक्षणिक आदान-प्रदान योजनेच्या अनुषंगाने चीन सरकारच्या शिक्षण मंत्रालय व राज्य प्रशासनाद्वारे परराष्ट्र व्यवहार विभागाच्या सॅप अनुदानातून साकारणाऱ्या या प्रकल्पाच्या निवडीचे पत्र प्रा.महाजन यांना डिपार्टमेंट ऑफ ॲप्लाइड फिजिक्स, कॉलेज ऑफ सायन्सेस्, चायना ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटी, बीजिंग, चायना यांच्याकडून प्राप्त झाले आहे.

`ओव्हरसीझ फेमस टीचर` प्रकल्पाचा मुख्य उद्देश चीन मधील कॉलेजेस व विद्यापीठातील शैक्षणिक गुणवत्तेच्या स्पर्धात्मकतेमध्ये वाढ करणे हा आहे. या उद्देशपुर्तीसाठी जागतिक स्तरावरील प्रथम दर्जाच्या निवडक तज्ज्ञांची वैज्ञानिक संशोधनाच्या मार्गदर्शनासाठी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ समितीकडून निवड केली जाते.सदर निवड करताना संबंधित तज्ज्ञ मार्गदर्शकाचे आपल्या विषयातील आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव पडणारे लिखाण, आंतरराष्ट्रीय जर्नल्स्मध्ये पुर्नविलोकनाचा अनुभव, उच्च शिक्षण क्षेत्रातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रमुख पदावरील कार्याचा अनुभव तसेच उच्च स्तरावरील शैक्षणिक बैठकांमध्ये मुख्य वक्ता म्हणून असलेला अनुभव इ.तपशीलवार दखल घेतली जाते.

या निवडीपुर्वी मागील दोन वर्षात प्रा.ए.एम.महाजन यांना ब्रीक्स देशाच्या सामुहिक प्रकल्पाच्या सादरीकरण व मार्गदर्शनासाठी तसेच आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत निमंत्रित व्याख्यान देण्यासाठी असे दोन वेळी चीन येथे जाण्याचा योग आला. या दोन्ही भेटी दरम्यान प्रा.महाजन यांचे तज्ञ मार्गदर्शन कौशल्य व जागतिक स्तरावरील त्यांच्या कार्याच्या योगदानाने प्रभावित झाल्याने, चायना ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटी, बिजिंग यांनी प्रा.महाजन यांना निमंत्रित करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होा व त्यानुसार त्यांना या `ओव्हरसीझ फेमस टीचर` प्रकल्पाची संधी मिळाली.

प्रकल्पाचे स्वरुपः-

आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्यंत निवडक तज्ञांचा समावेश असलेल्या या प्रकल्पाअंतर्गत ऑक्टो, 2018 ते सप्टेंबर, 2020 अशा दोन वर्षाच्या कालावधीसाठी ही सन्मानपुर्वक निवड करण्यात आली आहे असून या प्रकल्पाच्या अनुदाना अंतर्गत प्रा.महाजन यांना प्रकल्पात सहभागी होण्यासाठीचा खर्च म्हणून दोन लाख युऑन (सुमारे 21 लाख रुपये) प्रतिवर्षी याप्रमाणे शिक्षण मंत्रालय चायना यांचेकडून मंजूर केले आहे. या प्रकल्पासाठी वर्षभरातून 60 दिवस बीजिंग येथे प्रा.महाजन यांचे वास्तव्य राहील. या अंतर्गत 50 दिवस बीजिंग येथील चायना ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटी येथे तर उर्वरित 10 दिवस नॉर्थ चायना युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नोलॉजी येथे प्रा.महाजन हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून तेथील प्राध्यापक वर्ग व संशोधकांसमवेत तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा व मार्गदर्शन यावर्षी प्रा.महाजन हे ऑक्टोबर, 2018 दरम्यान दोन आठवडे त्यानंतर डिसेंबर मध्ये दोन आठवडे आणि मे-जून, 2019 दरम्यान चार आठवडे बीजिंग येथे वास्तव्य करतील. त्यांच्या या निवडीबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी प्रा.महाजन यांचे अभिनंदन केले.

..२..

**बातमी क्र.२**

जळगाव दि.12 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व नानासाहेब वाय.एन.चव्हाण कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,चाळीगसाव यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय नियतकालिक अंक संपादक मंडळाची कार्यशाळा दि.22 सप्टेंबर, 2018 रोजी आयोजित करण्यात आली आहे.

ही कार्यशाळा नानासाहेब वाय.एन.चव्हाण कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,चाळीगसाव येथे होणार आहे. संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभागातील वार्षिक नियतकालिक अंक प्रकाशन समिती सदस्यांमधून दोन सदस्यांची नावे प्राचार्यांच्या सही-शिक्क्यासह प्राचार्य, नानासाहेब वाय.एन.चव्हाण कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,चाळीगसाव यांच्याकडे दि. 19 सप्टेंबर, 2018 पर्यंत पाठवावेत. अधिक माहितीसाठी प्राचार्य एस.आर.जाधव दूरध्वनी क्र. 02589-222601, 9422789509, प्रा.जी.बी.शेळके 9595048421 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले आहे.

-------

**बातमी क्र.३**

जळगाव दि. 12 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 27 व्या पदवीप्रदान समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी / पदविका प्रमाणपपत्र घ्यावयाचे आहेत त्यांना दि.30 सप्टेंबर, 2018 पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत.

विद्यापीठातर्फे मार्च/एप्रिल/मे, 2018 व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home page वरील **Student Conner-Examination-Convocation** वर उपलब्ध आहेत. विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत 30 सप्टेंबर, 2018 असून दि. 01 ऑक्टोबर ते 10 ऑक्टोबर, 2018 या दरम्यान विलंब शुल्कासह अर्ज भरता येतील. नियमित पदवीप्रमाणपत्र शुल्क रु.350 आहे. उत्तीर्ण वर्षापासून 5 वर्षा पेक्षा जास्त कालावधी झाले असल्यास रु.1000 शुल्क भरावे लागेल. विलंब शुल्क रु.100 आहे. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/नेट बँकींग द्वारे ऑनलाईन भरावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ.ए.बी.चौधरी यांनी केले आहे.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक :12 सप्टेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)